# जाहीर अवाहन

## सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

### महिला व बाल विकास / दिव्यांग विभाग

**प्रशिक्षणाचे नांव - गरजू महिला व युवतीनां ब्युटी पार्लरचे मोफत प्रशिक्षण देणेबाबत.**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील गरजू होतकरु महिला व युवतींना मनपा महिला व बाल विकास / दिव्यांग विभाग तर्फे ॲडव्हान्स ब्युटी पार्लर चे मोफत प्रशिक्षण आयोजित केले आहे. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा 60 (साठ) दिवसांचा आहे, व यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. इच्छिूक व गरजू महिला व युवतींनी सदर प्रशिक्षणासाठी मनपा महिला व बाल विकास विभाग येथून प्रवेश अर्ज प्राप्त करुन घेऊन, दि. 05 डिसेंबर 2025 अखेर कार्यालयीन वेळेत आवश्यक कागदपत्रांसह प्रवेश अर्ज दाखल करावा. सदर प्रशिक्षणासाठी मर्यादीत लाभार्थि घेणेचे असल्याने प्रथम अर्ज दाखल करणाऱ्या पात्र उमेदवारांस प्राधान्याने प्रवेश दिला जाईल. मुदतीत दाखल होणाऱ्या व आवश्यक पात्रता धारण करणाऱ्या अर्जांचाच विचार करण्यात येईल. प्रवेश अर्जासोबत **1)आधारकार्ड 2) शैक्षणिक अर्हता - (किमान 10 वी.पास) 3) बेसिक ब्युटी पार्लर कोर्स प्रमाणपत्र 4) पासपोर्ट साईज 2 फोटो** इ. कागदपत्रे अत्यावश्यक आहेत.

(बाबासाहेब माळी )
महिला व बाल विकास अधिकारी
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मा.उप आयुक्तसो यांचे मान्यतेने

दिनांक 28/11/2025